म.कौ.हिं.का. अर्ज क्र. ०५/२०२४
दिपाली वि. दत्तात्रय
निशाणी क्र.– ३२ पुढे सुरु

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.०१**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की –**

**नांव –** दिपाली भ्र. दत्तात्रय जांभळे

**उलटतपास गरअर्जदारांच्या वतीने विधीज्ञ श्री. ए. एम. डोंगरे**

**०८.** माझे शिक्षण १२ वी झालेले आहे. मी १२ वी ची परीक्षा दिलेली नाही. माझ्या माहेरी आई–वडील, भाऊ–वहिनी असतात. मला एक बहिण आहे. माझे वडील व भाऊ शेती करतात. त्यांना ९ एकर जमिन आहे.

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, माझे व गैरअर्जदार क्र.१ चे लग्न दाखवण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर झालेले आहे. लग्न जमवण्यासाठी गैरअर्जदार यांच्याबाजूने गैरअर्जदार क्र.१ ची आई, शिवाजी पाटील, गैरअर्जदार क्र.१ चे मावसभाऊ असे हजर होते. माझ्या माहेरकडील आई–वडील, चुलते असे सर्वजण होते. गैरअर्जदारांनी मला लग्नात एक नेकलेस, पोहे हार व पाटल्या केल्या होत्या. ते सर्व किती वजनाचे होते ते मला माहीत नाही. माझ्या वडीलांनी चार तोळे सोने दिले होते. त्यामध्ये गैरअर्जदार क्र.१ व २ यांना अंगठ्या, गैरअर्जदार क्र.१ यांना लॉकेट याचा समावेश होता. मी त्या सोन्याची पावती पुराव्याकामी दाखल केली नाही.

**१०.** गैरअर्जदार यांनी माझ्या अंगावरील सोने कधी काढून घेतले याची तारीख मला सांगता येत नाही. वर्ष २०१५ होते. गैरअर्जदार यांनी सोने कोणत्या दुकानात विकले ते मला माहीत आहे पण त्याचे नाव मला माहीत नाही. सोने विकण्यासाठी मी सोबत गेले नव्हते. सोन्याची रक्कम किती आली होती ते मला माहीत नाही.

**११.** माझ्या लग्नाचा एकूण खर्च किती झाला होता ते मला माहीत नाही. मला एकूण तीन आपत्ये आहेत. त्यापैकी दोन मुली आहेत व एक मुलगा आहे. मला १४ वर्षांची व तीन वर्षांची मुली व १० वर्षाचा मुलगा आहे. मला शेवटचे अपत्य दिनांक २१.१२.२०२१ रोजी झालेले आहे. सन २०२१ अगोदर मला गैरअर्जदार यांच्यापासून त्रास असल्याबाबत मी पोलीसात तक्रार दिली नव्हती. माझी मोठी इयत्ता आठवी मराठी माध्यमात आहे. माझा मुलगा इयत्ता ५ वीत मराठी माध्यमात आहे. हे म्हणणे खरे आहे की, मराठी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांना विनामुल्य पुस्तके मिळतात. त्या दोघांची

शाळा अनुदानित नाही. त्या शाळेचे नाव विमलाबाई देशमुख कन्या शाळा आहे. माझे मुले काटापल्ले सर व सय्यद सर यांच्याकडे शिकवणीसाठी जातात. माझ्या मुलांना मोठा आजार नाही.

**१२.** माझ्या वडील व भावाने गैरअर्जदार क्र.१ यांना कोणत्या तारखेस पैसे ते मला सांगता येत नाही. ते चार लाख रुपये गैरअर्जदार यांनी गणपतीच्या व्यवसायात टाकले होते. तो व्यवसाय त्यांनी किती वर्ष केला ते मला सांगता येत नाही. गैरअर्जदार यांनी रुपये पाच लाखांची मागणी कोणत्या तारखेला केली ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ०२.१०.२०२३ पासून मी माहेरी आहे. दिनांक ०२.१०.२०२३ पूर्वी मी कधी भांडण करून माहेरी निघुन आले होते त्या तारखा मला आठवत नाहीत. मी माहेरी आल्यानंतर अहमदपूर पोलीस स्टेशनला दिनांक २०.१२.२०२३ रोजी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाच्या वडीलांच्या पोलीस ओळखीचे असल्याने मी गैरअर्जदाराविरूध्द खोटी तक्रार दिली होती.

**१३.** माझे लग्न जमले तयावेळी गैरअर्जदार क्र.१ फायनान्स व्यवसाय करत होता. मी त्याचा फायनान्सचा परवाना पाहिलेला नाही. गैरअर्जदार क्र.१ च्या गुत्तेदारीचा परवाना मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ ज्यांच्याकडे सेवक म्हणून काम करत असे त्यांनी त्यास सन २०१६ मध्ये मारहाण केल्यामुळे त्याचे दोन्ही हात निकामे झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे तो दोन ते वर्ष कोणतेही काम करत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ अपंग असतानाही मी त्याची सेवा केलेली नाही, त्याची सेवा त्याच्या आईने केलेली आहे. लातूर येथील दवाखान्याने गैरअर्जदार क्र.१ ६९ % अपंग असल्याचे प्रमाणपत्र दिलेले आहे किंवा कसे ते मला माहीत नाही. सन २०२३ पूर्वी गैरअर्जदार क्र.१ वर किती कर्ज होते ते मला सांगता येत नाही. अपंगत्वामुळे ॲक्सीस बँकेतील कर्ज माफ व्हावे म्हणून गैरअर्जदार क्र.१ ने लातूर येथील कलेक्टर यांना अर्ज दिला होत किंवा कसे ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०७.११.२०२३ रोजी गैरअर्जदार क्र.१ ने त्याचे भारतीय स्टेट बँकेतील कर्ज माफ व्हावे यासाठी अर्ज दिला होता.

**१४.** मी उदगीर येथे ज्या घरामध्ये गैरअर्जदार यांच्यासोबत राहत होते ते घर

गैरअर्जदार क्र.२ यांच्या नावे आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते घर गैरअर्जदार क्र.२ यांनी स्वतः १९९२ साली विकत घेतलेले आहे. त्या घराचा ८–अ उतारा माझ्या पाहण्यात आलेला नाही. त्या घराचे खरेदीखत मी पाहिलेले नाही. त्या घरामध्ये १० खोल्या आहेत. मी राहत असताना त्या घरात चार भाडेकरू होते. ते भाडेकरू कुटुंबासह होते. दिनांक ०२.१०.२०२३ रोजी सकाळी ८.३० वाजता आमच्यात जो वाद झाला तो सोडवण्यासाठी भाडेकरू आले होते. त्या भाडेकरूंची नावे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडलेली नसताना मी खोटी घटना शपथपत्रात नमूद केली आहे.

**१५.** गैरअर्जदार क्र.१ ची कमाई प्रतिमहा रुपये दिड लाख असल्याबाबत मी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ काहीही कमवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.२ त्यांनी घेतलेल्या घराच्या भाड्यातून गैरअर्जदार क्र.१ यांना सांभळतात.

**१६.** गैरअर्जदार क्र.१ नांदवायला तयार असेल तरी माझी नांदायची तयारी नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी इतक्या केसेस करूनही दिनांक ११.०२.२०२५ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने मला नांदायला बोलवण्यासाठी माझ्या गावच्या पत्त्यावर नोटीस पाठविली होती. मी माझ्या वडीलांकडे गावी राहते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ ची प्रतिमहा रुपये १५ हजार पोटगी देण्याची ऐपत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांनी मला कधीही शारिरीक, मानसिक त्रास दिलेला नाही, माझ्या चारित्र्यावर संशय घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी गैरअर्जदार क्र.१ यास लग्नात चार तोळे सोने व रुपये दिड लाख हुंडा दिल्याचे मी खोटे सांगत आहे.

**१७.** सन २०1३ मध्ये माझी मुलगी आरूषी जन्मली त्यावेळी माझी तब्यत खराब होती व गर्भ ठेवण्यासारखी परिस्थीती नव्हते असे डॉक्टरांनी प्रमाणपत्र दिलेले नाही. गैरअर्जदार क्र.१ चे माझ्यासोबत दुसरे लग्न आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ हा त्याचे पहिले लग्न मोडल्याने माझ्यासोबत व्यवस्थित राहत असे व माझे सर्व ऐकत असे. हे म्हणणे खरे आहे की, मी माहेरी राहत असताना गैरअर्जदार क्र.२ दिवाळीच्या सणाला माझ्या मुलांना कपडे घेऊन आल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की,

त्यांनी मला नांदायला येण्याची विनंती केली होती. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा गैरअर्जदार क्र.२ चा मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांच्या नावावरील घर माझ्या नावावर केल्यास मी नांदायला येते अशी अट मी गैरअर्जदार क्र.१ व २ यांना घातली होती. गैरअर्जदार क्र.२ चे वय ५० ते ५५ वर्ष आहे. माझे सासरे आमच्यापाशी राहत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.१ वर गैरअर्जदार क्र.२ यांचा सांभाळ करण्याची जबाबदारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.२ चे वय ६० पेक्षा जास्त असल्याने त्यांना दवाखान्याचा खर्च आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकुर खोटा आहे.

उलटतपास पूर्ण.

**फेरतपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.09.18 17:39:24 +0530

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –१८.०९.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.